# पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा, ठाणे शहर

OW/DCP TRAFFIC THN/ADM/ NOTIFACTION/ ६३ /2017
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतूक शाखा,यांचे कार्यालय,तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दिनांक :– 20122017
दुरध्वनी कमांक 022- 25401056

**"वाहतूक नियंत्रण अधिसुचना"**

कळवा वा. उपविभागाचे हद्दीतून बेलापुर मार्गावरील कळवा –विटावा दरम्यान रेल्वे ब्रिज (RUB) खाली मोठया प्रमाणात खड्डे पडले असल्याने त्या ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम ठाणे महानगरपालिकेतर्फे करण्यात येणार आहे. बेलापुर मार्गावरून नवी मुंबई कडून ठाण्याकडे व ठाण्याकडून नवी मुंबई कडे वाहनाची मोठया प्रमाणात ये–जा होत असल्याने पुलाखालील कामासाठी या मार्गावरील व परिसरातील वाहतुक सुनिश्चित होण्याकरीता, आम जनतेच्या सोईसाठी,

महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए. –११६/सी.आर/३७/टी.आर. दि.०७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून, मी अमित का.काळे, पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा, ठाणे शहर खालील प्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे :–

**सदरची अधिसुचना दिनांक २१/१२/२०१७ रोजी २४.०० वा. पासून ते दिनांक २५/१२/२०१७ रोजी २४.०० वा. दरम्यान ,सदरचे पुलाखालील रस्त्याचे काम पुर्ण होई पावेतो अमलात राहिल.**

१) नवी मुंबई कडून बेलापुर रोडने व ऐरोली पटणी कंपनी मार्गे विटावा –कळवा –ठाण्याचे दिशेने येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनास **पटणी कंपनी कडून बेलापुर रोडला मिळणाऱ्या** ठिकाणी **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– सदरची वाहने बेलापुर ठाणे रोड या ठिकाणी पटणी जंक्शन येथे डावीकडे वळण घेवून –पटणी ऐरोली रोडने –ऐरोली नॉलेज पार्क –स्वर्गीय सुनिल चौगुले चौक –दिवा कोळीवाडा चौक येथे उजवीकडे वळण घेवून ऐरोली ब्रिज–ऐरोली टोल प्लाझा –ऐरोली जंक्शन येथे उजवीकडे वळण घेवून –पूर्व द्रुतगती महामार्गाने –आनंदनगर चेक नाका येथून इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसचुना ही पोलीस वाहने, रूग्णवाहीका, फायरब्रिगेड ,अत्यावश्यक सेवेतील तसेच सदर पुलाचे कामातील वाहनास लागु रहाणार नाही.

( अमित का.काळे )
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतूक शाखा,
ठाणे शहर

प्रति,
जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे
२/–सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहीतीसाठी सादर :–**
मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर व नवी मुंबई.
मा.अपर पोलीस महासंचालक, (वाहतुक), महाराष्ट्र राज्य,मुंबई
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर